आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता

२४ नोव्हेंबर २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जो देश आपला इतिहास जपतो, त्यांचं भविष्यही सुरक्षित असतं असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं 'मन की बात' मध्ये प्रतिपादन

- महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश, मुख्यमंत्रीपदाबाबत कोणतेही मतभेद नाहीत असं एकनाथ शिंदे यांच्याकडून स्पष्ट

- झारखंडमध्ये विधिमंडळ पक्षनेत्याच्या निवडीसाठी इंडिया आघाडीची आज रांचीमध्ये बैठक

- संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आज सर्वपक्षीय बैठक

**आणि**

- कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात, यशस्वी जयस्वालच्या दीड शतकी खेळीमुळे भारत भक्कम स्थितीत

**<><><><><>**

जो देश आपला इतिहास जपतो, त्यांचं भविष्यही सुरक्षित असतं असं प्रधानमंत्री म्हणाले. याच उद्देशानं देशातल्या गावांचा इतिहास जतन करण्यासाठी एक निर्देशिका तयार करायचा प्रयत्न सुरू आहे, प्राचीन काळातील सागरी प्रवासाबद्दलच्या भारताच्या क्षमतेशी संबंधित पुरावे जतन करण्याची मोहीमही सुरू केली आहे, असं त्यांनी सांगितलं. प्रधानमंत्र्यांनी आज आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते.

हा या कार्यक्रमाचा ११६ वा भाग होता. याच प्रयत्नांचा भाग म्हणून गुजरातमध्ये लोथल इथं एक संग्रहालय उभारलं जात असून, नागरिकांकडे कोणत्याही हस्तलिखिताची वा ऐतिहासिक दस्तऐवजाची प्रत असेल तर ती त्यांनी भारतीय राष्ट्रीय अभिलेखागाराच्या मदतीनं जतन करावी असं आवाहन त्यांनी केलं. या वेळी प्रधानमंत्र्यांनी गयाना, ओमान, स्लोव्हाकिया यांसारख्या देशांसह इतरत्रही स्थलांतरीत झालेल्या भारतीयांनी त्या प्रदेशांशी एकरूप होतानाही आपला भारतीय वारसा आणि संस्कृतीच्या नोंदीकरणीसाठी करत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली.

डिजिटल अटक या प्रकाराची तरतूद अस्तित्वातन नसून हे लोकांना फसवण्याचे कारस्थान असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज पुन्हा एकदा स्पष्ट केलं. अशा प्रकारच्या गुन्ह्यांना, ज्येष्ठ नागरिक जास्त बळी  पडतात. अशा परिस्थितीत त्यांना जागरुक करणं आणि सायबर घोटाळ्यांपासून वाचवण्यामध्ये मदत करणं ही आपली जबाबदारी असल्याचं ते म्हणाले.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी एक पेड माँ के नाम या मोहीमेच्या यशाबद्दलही श्रोत्यांना सांगितलं. या मोहिमे अंतर्गत अवघ्या पाच महिन्यात १०० कोटी वृक्ष लागवडीचा टप्पा पार झाला असल्याची माहिती त्यांनी दिली.

आज राष्ट्रीय छात्रसेना दिवस असल्याचं स्मरण प्रधानमंत्र्यांनी केलं. आपणही राष्ट्रीय छात्रसेनेत होतो, त्यावेळचा आपला अनुभव स्वतः साठी अमूल्य आहे. राष्ट्रीय छात्रसेनेमुळे युवा वर्गात शिस्त, नेतृत्व आणि सेवेची भावना रुजते असं ते म्हणाले. सध्याच्या काळात राष्ट्रीय छात्र सेनेमधल्या मुलींची संख्या २५ टक्क्यावरून वाढून ४० टक्क्यापर्यंत पोहचली असल्याचं त्यांनी सांगितलं. विकसित भारताच्या जडणघडणीत युवा वर्गाची भूमिका मोठी आणि महत्वाची असणार आहे असं प्रधानमंत्री म्हणाले.

**होल्ड... प्रधानमंत्री बाईट ...**

येत्या १२ जानेवारीला स्वामी विवेकानंद यांच्या १६२ व्या जयंतीदिनी साजरा होणाऱ्या असलेल्या युवा दिनाच्या निमित्तानं दिल्लीत ११ आणि १२ जानेवारी रोजी दिल्लीत भारत मंडपम इथं विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग या उपक्रमाअंतर्गत युवा मेळाव्याचं आयोजन केलं असल्याची माहिती त्यांनी दिली. या मेळाव्यात देशाच्या तळागाळातून निवडलेले दोन हजार तरुण - तरुणी सहभागी होणार आहेत. आपण लाल किल्ल्यावरून युवा वर्गाला राजकारणात येण्याचं आवाहन केलं होतं, त्याअनुषंगानंच या उपक्रमाचं आयोजन केलं असल्याचं ते म्हणाले. जगभरातली प्रतिष्ठित तज्ज्ञांसह आपणही या उपक्रमात सहभागी होणार आहोत, या उपक्रमातूनयुवा वर्गाला त्यांच्या कल्पना मांडायची संधी मिळेल तसंच त्या प्रत्यक्षात साकारण्यासाठी कृती आराखडाही तयार करता येईल असं म्हणत, आपण सारे मिळून देश घडवू या आणि देशाचा विकास करू या असं आवाहन त्यांनी केलं. पुस्तकं माणसाची सर्वात जास्त चांगली मित्र असतात आणि ग्रंथालयं ही मैत्री घट्ट करणारी उत्तम जागा असतात. असं म्हणत देशभरात ग्रंथालयांची सोय उपलब्ध करून देण्यासाठी सामान्य नागिराकंकडून होत असलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी दिली. समाजाच्या सक्षमीकरणासाठी वाचनालये खूपच उपयुक्त ठरत असून, नागिराकांनीही आपलं जीवनमान बदलण्यासाठी पुस्तकांशी मैत्री वाढवण्याचं आवाहन त्यांनी केलं. यावेळी प्रधानमंत्र्यांनी पर्यावरण, वन्य जीव संवर्धन तसंच स्वच्छतेचं महत्व आणि त्यादृष्टीनं होत असलेल्या प्रयत्नांचा पुन्हा एकदा मन की बात मध्ये उल्लेख केला. स्वच्छतेसाठी शासकीय कार्यालयांमध्ये राबवलेल्या उपक्रमांची तसंच नागरिकांकडून सुरु असलेल्या उपक्रमांची माहितीही त्यांनी श्रोत्यांना दिली. यानिमित्तानं त्यांनी अक्षरा आणि प्रकृति या मुंबईतल्या दोन मुली आपल्या सहकाऱ्यांसोबत चिंध्यांपासून फॅशनचे कपडे तयार करत असल्याचा

उल्लेख करून त्यांच्या उपक्रमाची प्रशंसा केली. अशा प्रयत्नांमुळे देशाच्या स्वच्छता मोहिमेला चालना मिळते, आणि ही एक अविरत किंवा अखंड चालणारी मोहीम आहे असं ते म्हणाले.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीच्या निकालाचं चित्र स्पष्ट झाल्यानंतर विधानसभा निवडणुकीची अधिसूचना आज प्रसिद्ध होईल. त्यानंतर १५ ऑक्टोबर रोजी जाहीर झालेली आचारसंहिता संपेल, अशी माहिती निवडणूक आयोगाच्या सूत्रांनी दिली आहे. दरम्यान, या निवडणुकीत भाजपा आणि महायुतीला विक्रमी यश मिळालं, तर काँग्रेस आणि महाविकास आघाडीला कधी नव्हे इतक्या कमी जागा मिळाल्या. निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावरच्या अंतिम आकडेवारीनुसार २८८ पैकी २३० जागा महायुतीतल्या प्रमुख पक्षांना मिळाल्या आहेत. भारतीय जनता पक्षाला १३२ जागांवर विजय मिळाला असून शिवसेनेला ५७, तर राष्ट्रवादी काँग्रेसला ४१ जागांवर विजय मिळाला आहे. महाविकास आघाडीतल्या प्रमुख तीन पक्षांना फक्त ४६ जागांवर समाधान मानावं लागलं. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला २० जागा मिळाल्या, काँग्रेसला १६, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला १० जागांवर जनतेनं कौल दिला. समाजवादी पक्ष, जनसुराज्य पक्ष आणि अपक्षांना प्रत्येकी दोन जागी विजय मिळाला आहे. राष्ट्रीय युवा स्वाभिमान पक्ष, राष्ट्रीय समाज पक्ष, एमआयएम, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, शेतकरी कामगार पक्ष आणि राजर्षी शाहू विकास आघाडी या पक्षांनी प्रत्येकी एका जागेवर बाजी मारली आहे.

<><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ गटनेतेपदी अजित पवार यांची निवड करण्यात आली आहे. पक्षाच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक आज मुंबईत पार

पडली. त्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. अजित पवारांसह खासदार प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, आमदार दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे यांच्यासह इतर नेते या बैठकीला उपस्थित होते.

<><><><><>

पक्षनिहाय टक्केवारी पाहता, सर्वाधिक, म्हणजे २६ पूर्णांक ७७ टक्के मतं भाजपाला मिळाली आहेत. त्याखालोखाल १२ पूर्णांक ४२ शतांश टक्के मतं काँग्रेसला, तर १२ पूर्णांक ३८ टक्के मतं शिवसेनेला मिळाली आहेत. ११ पूर्णांक २८ टक्के राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या बाजूने आहेत, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला जवळपास १० टक्के मतदारांनी कौल दिला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला फक्त १ पूर्णांक ५५ टक्के मतदारांचा पाठिंबा मिळाला आहे, तर शून्य पूर्णांक ७२ शतांश, म्हणजे ४ लाख ६१ हजार ८८६ मतदारांनी नोटा हा पर्याय निवडला आहे.

<><><><><>

झारखंडमध्ये इंडिया आघाडीच्या नेत्याच्या निवडीसाठी घटकपक्षांच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक आज रांची इथं होणार आहे. झारखंड मुक्ती मोर्चा, काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल आणि मार्क्सवादी लेनिनवादी कम्युनिस्ट पक्षाचे आमदार या बैठकीला हजर राहतील. इंडिया आघाडीच्या विधानसभा पक्षनेतेपदी हेमंत सोरेन यांची निवड होण्याची शक्यता सूत्रांनी वर्तवली आहे. त्यानंतर हेमंत सोरेन झारखंडमध्ये सरकारस्थापनेचा दावा करतील. झारखंड विधानसभा निवडणुकीत झारखंड मुक्ती मोर्चा सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला आहे. ८१ पैकी ३४ जागांवर झारखंड मुक्ती मोर्चाला विजय मिळाला आहे. भाजपाला २१, काँग्रेसला १६, तर राष्ट्रीय जनता दलाला ४ जागांवर विजय मिळाला आहे. मार्क्सवादी लेनिनवादी कम्युनिस्ट पक्षाला दोन जागांवर जनतेनं कौल दिला आहे.

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता

२४ नोव्हेंबर २०२४ - रविवार

<><><><><>

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला उद्यापासून सुरुवात होत आहे. त्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं आज सर्व पक्षीय बैठक बोलावली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार आहे. अधिवेशनादरम्यान संसदेच्या दोन्ही संभागृहांचं कामकाज सुरळीत चालावं, यासाठी सर्व राजकीय पक्षांना आवाहन करण्यासाठी या बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचं कामकाज उद्यापासून सुरू होणार असून ते २० डिसेंबरपर्यंत निश्चित करण्यात आलं आहे. या अधिवेशनादरम्यान २६ नोव्हेंबरला संविधान दिन साजरा केला जाणार आहे; त्या दिवशी संसदेचं सत्र होणार नाही.

<><><><><>

लोकसभेच्या नांदेड आणि वायनाड या दोन जागांसाठीच्या पोटनिवडणुकीचे निकालही काल स्पष्ट झाले. त्यात नांदेडमध्ये वसंतराव चव्हाण यांचे पुत्र रवींद्र चव्हाण यांनी तर वायनाडमध्ये प्रियांका गांधी यांनी विजय मिळवला.

<><><><><>

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात पर्थ इथं सुरू असलेल्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात, यशस्वी जयस्वालच्या दीड शतकी खेळीमुळे दुसऱ्या डावात भारत भक्कम स्थितीत पोहोचला आहे. सामन्याच्या आज तिसऱ्या दिवशी काल ९० धावांवर नाबाद असलेलेल्या यशस्वी जयस्वालनं शतक पूर्ण करत १६१ धावांची खेळी केली, तर एक के.एल. राहुल ७७ धावा करून बाद झाला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ५ बाद ३७५ धावा झाल्या होता.

//<><><><><>//